# गुहागर नगरपंचायत,गुहागर
# ई निविदा सुचना सन २०२६/२७
## कार्यालयाचे नाव: -गुहागर नगरपंचायत,गुहागर, ता-गुहागर,जि- रत्नागिरी

गुहागर नगरपंचायत, जि-रत्नागिरी यांचे व्दारा खालील नमूद काम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविणे योजनेतंर्गत असून सदर कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून सदर कामा करिता शासन मान्यताप्राप्त पात्रता धारकांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. कोणतीही १ निविदा स्विकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, गुहागर नगरपंचायत यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची बयाणा रक्कम | मक्तेदार वर्ग | काम पुर्ण करणेची मुदत (पावसाळा सोडून) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरेंद्र साटले घर ते किसन साटले घरापर्यंत गटर बांधणे | १६०८९६५/- | १५००/- | ३२२००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| २ | गुहागर दुर्गादेवीवाडी डांगळे होम ते दिपक सांगळे घरापर्यंत रस्त्याला गटर बांधणे | २०५४३१५/- | १५००/- | ४११००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| ३ | गुहागर नारायणवाडी मुकुंद गोणबरे घर ते अष्टवणे मंदिर पाखाडी बांधणे | १६१२९७२/- | १५००/- | ३२३००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| ४ | वरचापाट नरेंद्र वराडकर घर ते महागणपती मंदिरापर्यंत रस्त्याला गटार बांधणे | ११८८६६९/- | १५००/- | २३८००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| ५ | गुहागर दुर्गादेवी खांब ते समुद्रपर्यंत गल्लीला पेव्हर ब्लॉक बसविणे. साईटला चिरे बांध घालणे. | १२०४३५६/- | १५००/- | २४१००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| ६ | एकनाथ बागवे घरापासून ते उमेश माचिवले घरापर्यंत रस्त्याला सरंक्षण भिंत बांधणे. | २०१०३६२/- | १५००/- | ४०२०७/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| ७ | वरचापाट परशुराम बने घर ते रेवा नदीपर्यंत रस्त्याला गटर तयार करणे व रस्ता मजबुतीकरण करणे | ११८८९२१/- | १५००/- | २३८००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| ८ | अष्टवणे मंदिर ते जयंत गोणबरे घरापर्यंत पाखाडीला गटार व सरंक्षण भिंत बांधणे | १२१११७७६/- | १५००/- | २४३००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| ९ | छत्रपती शिवाजी महाराज चौक हातिसकर घर ते परटवणे पर्यंत नाल्याला सरंक्षक भिंत बांधणे. | २०१९०७७/- | १५००/- | ४०४००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| १० | किर्तनवाडी संत ज्ञानेश्वर सभागृहाजवळील मुख्य रस्त्याला सरंक्षण भिंत बांधणे | १२०९९७०/- | १५००/- | २४२००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| ११ | छत्रपती शिवाजी महाराज चौक गौरी परटवणे नाल्याला बंधारा बांधणे. | २४२१९२४/- | १५००/- | ४८५००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| १२ | गुहागर वरचापाट दुर्गादेवीवाडी दिनानाथ सांगळे घराजवळील गटाराला सरंक्षण भिंत बांधणे. | २३९०३११/- | १५००/- | ४७९००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| १३ | गुहागर वरचापाट दुर्गादेवीवाडी लीलाधर लाड घर ते दत्ताराम जांगळी घरापर्यंत रस्त्याला सरंक्षण भिंत बांधणे | १२०७४३९/- | १५००/- | २४२००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| १४ | गुहागर वरचापाट निलेश मोरे घर ते दत्त मंदिर ते तलाव पर्यंत रस्त्याला सरंक्षण भिंत बांधणे | १६११३९३/- | १५००/- | ३२३००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |
| १५ | गुहागर खालचापाट जांगळेवाडी चव्हाटा ते जांगळेवाडी सभागृह रस्ता तयार करणे | १९६८४५४/- | १५००/- | ३९४००/- | वर्ग ६ व त्यावरील | ४ महिने |

## ई-निविदा वेळापत्रक
## निविदा प्रक्रियेची तारीख व वेळ

| अ.क्र | निविदा प्रक्रियेचे स्वरूप | वेळ |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि. १५/०५/२०२६ स.१०.००वा. पासून<br>दि. २१/०५/२०२६ सा. ०६.०० वा. पर्यंत |
| २ | ऑनलाईन निविदा भरण्याचा कालावधी | दि. १५/०५/२०२६ स.१०.००वा. पासून<br>दि. २१/०५/२०२६ सा. ०६.०० वा. पर्यंत |
| ३ | तांत्रिक लखोटा उघडण्याची वेळ व तारीख | दि. २२/०५/२०२६ स. १०.०० वाजता |
| ४ | वाणिज्य लखोटा उघडण्याची वेळ व तारीख | - |

## अटी व शर्ती पुढीलप्रमाणे

१) सदर कामांच्या निविदा मुख्याधिकारी नगरपंचायत गुहागर, जि-रत्नागिरी यांचे कार्यालयात दि. २२/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजलेनंतर ऑनलाईन उघडणेत येईल.

२) वरील कामांसाठी कंत्राटधाराने खालील नमूद कागदपत्रेच www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहेत. खालील नमूद कागदपत्रांव्यतीरिक्त अन्य कागदपत्रे अपलोड करु नयेत.

i. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेकेदार नोंदणी प्रमाणपत्र.
ii. G.S.T. नोंदणी प्रमाणपत्र.
iii. केलेल्या कामाचे अनुभवाचे दाखले.
iv. मागील ०३ वर्षाचे आर्थिक भरणा केलेले आयकर रिटर्न.
v. पॅनकार्ड निविदा फॉर्म फी व बयाणा  रक्कम इ ऑनलाईन भरणाकेल्याची पावती सोबत जोडणे निविदाधारकास बंधनकारक आहे.
vi. वरील सर्व कामांसाठी निविदेसोबत जोडलेले (अपलोड केलेले) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट -१) (सत्य प्रतिज्ञापत्र affidavit) रक्कमरू. ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर लिफाफा क्र.०१ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
vii. वरील सर्व कामांसाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयौगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (आय) व कलम ४४ (१) (ब) च्या तरतूदीनुसार नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाच्या कोणताही हिस्सा किंवा हित संबध किंवा आमचेशी भागीदारी नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट अ) लिफाफा क्र.०१ मध्ये जोडणे कंत्राटधारकास बंधनकारक राहील.
viii. कंत्राट दाराकडील यंत्रसामुग्रीचे तपशिल सोबत जोडणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
ix. कुशल व तांत्रिक कर्मचारी यादी सोबत जोडणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
x. काळ्यायादीत नाव नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल. (परिशिष्ट ब)
xi. वरील सर्व कामांसाठी नियुक्त केलेल्या कामगारांचा भविष्यनिर्वाह निधी संबधित विभागाकडे जमाकरणे साठी भविष्यनिर्वाह निधी नोंदणी प्रमाणित प्रत जोडणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
xii. सदरचे दर हे G.S.T वगळून आहेत याची निविदाधारक यांनी नोंद घ्यावी.

३) कंत्राटधाराने www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अपलोड केलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रत गुहागर नगरपंचायत कार्यालयाकडे २२/०५/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे.

नगरपंचायत गुहागर स्थापना ६ ऑक्टोबर २०१२ जि.रत्नागिरी

**(स्वप्निल चव्हाण)**
**मुख्याधिकारी,**
**गुहागर नगरपंचायत,गुहागर**

**अटी व शर्ती-**

१. सर्व पात्र इच्छुक कंत्राटदार यांनी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे.

२. ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी कंत्राटदाराने प्रथम डिजीटल सिग्नेचर सर्टीफिकेट (DSC) युजर आय.डी व पासवर्ड करून घेणे आवश्यक आहे.

३. निविदेतील बी -१ नमुन्यातील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

४. वरीलकामांची निविदा प्रक्रिया ई-निविदा प्रक्रियेव्दारे ऑनलाईन करणेत येत असून या निविदेसंबधी या पुढील सर्व सुचना/शुध्दीपत्रके www.mahatenders.gov.in या वेबसाईटच्या माध्यमातूनऑनलाईनकरणेतयेईल.

५. वरील कामांबाबत संपुर्ण माहिती www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर उपलब्धआहे.

६. Online Upload करण्यात येणारी कागदपत्रे ही सुस्पष्ट असावीत.

७. मंजूर निविदाधारकांनी निविदांतील कामांचे किंमतीनुसार मुद्रांक शुल्क अधिनियम १५५८ कलम ३४ मध्ये दि. २४/०४/२०१५ च्या शुध्दीपत्रकानुसार रक्कम रू. १० लाखापर्यंत रू. ५००/- व त्यावरील प्रत्येक ५ लाखास रू. ५००/- तसेच त्यावरील उर्वरित रक्कमेस रु.५०० प्रमाणे मुद्रांक देणे व त्यावर करारनामा करून देणे बंधनकारक आहे.

८. निविदाधारकांनी एकदा ऑनलाईन भरलेली निविदा कोणत्याही परिस्थितीत मागे घेता येणार नाही. तसे केल्यास निविदेसोबत भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्याचा व संबधित निविदाधारकावर कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी, गुहागर नगरपंचायत यांनी राखून ठेवलेला आहे.

९. कोणत्याही परिस्थितीत Price Escalation देण्यात येणार नाही. तसेच सदर काम हे शासकीय निधी मधून करण्यात येणार असून निधीच्या उपलब्धते नुसार व कामाच्या प्रगती नुसार देयक अदा करण्यात येईल. अंदाजपत्रकाचे रक्कमे पेक्षा जादा काम झाल्यास त्या कामाचे देयक जादा अदा करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. विमा संचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडील दिनांक २१/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये रु. २५ लाखापर्यंतच्या ०.५% विमा व त्या वरीलरु. २५ लाखा वरील कामासाठी १% विमा उतरविणे आवश्यक आहे. सदर विमा न उतरविल्यास वरीलप्रमाणे विमा रक्कम देयकातून कपात केली जाईल.

११. सदर निविदेतील कामाबाबत कोणतेही कारण न देता अथवा सर्वच निविदा नाकारण्याचा हक्क नगरपंचायतीने राखून ठेवलेला आहे.

१२. वरील कामामध्ये वापरण्यात येणाऱ्या गौणखनिज, स्वामित्वधन भरणा केल्याचे प्रमाणपत्र तसेच कामामध्ये वापरलेले साहित्याचे गुणपरिक्षण अहवाल (Test report) व शासननिर्णय २८ मार्च २०१८ नुसार त्रयस्तसंस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण अहवाल (Third Party audit report) करुन या कार्यालयास प्राप्त झाल्याशिवाय कंत्राटदारास अंतिम देयक अदा केले जाणार नाही.

१३. कामाच्या ठिकाणी कंत्राटदारास कामाचे फलक यामध्ये कामाचे नाव, अंदाजपत्रकीय रक्कम व काम करणारी यंत्रणा इत्यादी बाबीचा उल्लेख असलेला नामफलक स्वखर्चाने कामाचे दर्शनी भागास लावावा लागेल तसेच रस्त्यालगत पाईपलाईन खोदाई करावयाची झाल्यास वाहतूक व रहदारीस कोणताही अडथळा येऊ न देण्याची तसेच खोद काम केलेला रस्ता पुर्ववत करुन देण्याची जबाबदारी मंजूर निविदाधारकास राहील.

१४. निविदाकार यांनी निविदेमध्ये दिलेले दर निविदा उघडलेच्या दिनांकापासून ९० दिवसांपर्यंत ग्राह्य राहतील.

१५. निविदा सुचनाही कामाच्या करारनाम्याचा भाग राहील.

१६. पार्टनरशीप असेल तर पॉवर ऑफ ऑटर्नीबाबत सदर कामाकरीता निविदाधारक यांच्या वतीने कुलमुखत्यारयांनी निविदा सादर केल्यास त्याबाबतचे सर्व आवश्यक सर्वकागदपत्रे [नोदणीकृत कुलमुखत्यार इ.] निविदेसोबत सादर करणे निविदाधारक यांचेवर बंधनकारक राहील.

१७. कामाच्या मुदतीच्या आत काम न केल्यास कमीत कमी रुपये १००/- प्रती दिन किंवा जास्तीत जास्त अंदाजपत्रकीय रकमेच्या १०% रक्कम दंड स्वरुपात आपले देयकातून कपात करण्यात येईल. विहीत मुदतीत काम पुर्ण न केल्यास कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. आणीबाणीच्या स्थितीत उक्त निविदेस मुदतवाढ दिल्यास मंजूर निविदाधारकास पुर्व मंजूर दराने कामकरणे बंधनकारक राहील.

१८. नियमानुसार शासकीय कपाती करण्यात येईल.

१९. निधीच्या उपलब्धतेनुसार देयक अदा करणेत येईल.
२०. सर्व कामांचा दोष दायित्व कालावधी [DLP] २ वर्षाचा राहिल
२१. उपरोक्त नमूद काम हे अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील यांच्या खंड क्रमांक १ व खंड २ मधील Standard Specification प्रमाणे करणे निविदाधारक यांच्यावर बंधनकारक राहील. अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेल्या मानांकनानुसार कामाचा दर्जा राखणे निविदाधारक यांजवर बंधनकारक राहील. कामाची व्याप्ती व स्वरुप याची संपुर्ण माहिती नगरपंचायत कार्यालयात प्राप्त करुन घ्यावयाची आहे व तद्‌नंतर निविदा भरावयाची आहे. मागाहून कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.
२२. सदर काम शासकीय योजने अंतर्गत मंजूरअसल्याने विहीत मुदतीत काम करणे बंधनकारक असून निधिच्या उपलब्धतेनुसार व कामाच्या प्रगती नुसार टप्प्या टप्प्याने देयक अदा करणेत येईल.
२३. सदर काम करतेवेळी प्रत्यक्ष जागेवर वस्तूनिष्ठ अडचणी उद्भवल्यास त्या तात्काळ दूर करणे ही कंत्राट दाराची प्राथमिक जबाबदारी राहील. विहीत मुदतीत काम पुर्ण करणे कंत्राटधारकास बंधनकारक राहील.
२४.उपरोक्त नमुद कामा करिता भरणाकरण्यात आलेली सुरक्षा अनामत व बयाना रक्कम परताव्याचा दोष दायित्व कालावधी हा २ वर्ष राहील. सदर कालावधीमध्ये कामाची समाधानकारक गुणवत्ता राहील्यास तद्‌नंतर सदरची रक्कम विहीत कालावधी संपल्यावर कंत्राटदारास प्रदान करण्यात येईल.
२५. निविदाधारकांनी गुहागर नगरपंचायतीचे हितास बाधा पोहचेल असे कोणतेही वर्तन केल्याचे तसेच विहीत मुदतीत सेवा न दिल्याचे आढळून आल्यास सदर निविदाधारकाने जमा केलेली बयाना रक्कम व अनामत रक्कम कोणतीही पुर्व सुचना न देता जप्त करण्याचा व सदर ठेका रदद करण्याचा अधिकार मुख्याधिकारी गुहागर नगर पंचायत यांनी राखून ठेवलेला आहे.
२६. निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १० टक्के पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदाराने निविदाधीन किमतीच्या १ टक्के एवढया रकमेचा धनाकर्ष तसेच निविदाधिन कामाच्या १० टक्के पेक्षा जादा दराची असेल तर देकार जेवढ्या कमी दराने कमी आहे तेवढया रकमेचा प्रती १ टक्के प्रमाणेचा धनाकर्ष लिफाफा क्र.२ मध्येसादर करावा [ स्कॅनकरुन ई-निविदे सोबत सादर करावा]. [उदा. १४ टक्केकमीदर १० टक्केपर्यंतकरीता १ टक्का व । १४ टक्के - १० टक्के ] -४ टक्केअसेएकूण 5 टक्के असा डिमांडड्राफ्ट निविदेसोबत सादर करावा. ] व देकार १५ टक्के क मीदराचा असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी 2 पटीने रक्कम डी.डी. द्वारे सादरकरणे अनिर्वाय राहील. उदा. १९ टक्के कमी दर- [१९- १५= ४ टक्के x २= ८ टक्के]].
२७.निविदापत्राची रक्कम व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य राहीलयामध्ये कोणत्याही प्रकारची सुट वजा सवलत ग्राह्य धरली जाणार नाही. याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.
२८. निविदाधारकाच्या किंवा संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणीमुळे निविदाभरण्याच्या व अन्य कालावधीमध्ये बदल किंवा वाढ केली जाणार नाही. संकेतस्थळावर तांत्रिक अडचणीसाठी गुहागर नगरपंचायत कार्यालय जबाबदार राहणार नाही.
२९. उपरोक्त कामाच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही मुद्दे उपस्थित झाल्यास त्याची पुर्तता करणे संबंधित मक्तेदारास बंधनकारक राहील व लेखापरिक्षणातकाही आक्षेप आल्यास अथवा वसुली निघाल्यास सदरची रक्कम आपणांस कोणत्याही कायदेशीर बाबीचा अवलंब न करता नगरपंचायत फंडात भरणा करणेबंधनकारक राहील.
३०. सदर कामाच्या अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेल्या विदयुतीकरणाच्या व संबंधित बाबी या अंदाजपत्रकामध्ये तरतूदी नुसार तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडील Standard Specification प्रमाणेकरणे निविदाधारक यांच्यावर बंधनकारक राहील. अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेलया मानांकानुसार कामाचा दर्जा राखणे निविदाधारक यांच्यावर बंधनकारक राहील.
३१. एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवला आहे. नाकारलेल्या निविदांची/दरपत्रकांची कोणतीही तोंडी अथवा लेखीकारणे दिली जाणार नाहीत. तसेच उक्त निविदा सूचनेमध्ये तसेच बी - १ मधील कोणतीही अट रदद करण्याचा अथवा शिथिल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
३२. निविदे सोबत सादर करण्यात येणारे निविदा दर व सत्य प्रतिज्ञापत्र निविदाधारक उक्त निविदेच्या कामाच्या स्वरुपाचा पुर्ण अभ्यास करुन तसेच कामगार साहित्य उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन कामाचे दर व प्रतिज्ञापत्र सादर केल्याचे गृहीत धरण्यात येईल.
३३. अंदाजपत्रका व्यतिरिक्त जादाचे काम करणेत येऊ नये तसे झाल्यास त्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील व जादाच्या कामाचे बील अदा करणेत येणार नाही.

३४.स्थायी निर्देश ३६ व ३७ तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कमल ९३ अन्वये निविदे संदर्भात उल्लेख करण्यात आलेले सर्व नियम व अटी सदर निविदेत लागू राहतील.

"निविदाधारकास काम मंजूर झाल्यानंतर पुढील अट क्र.३५ ते ५३ याअटींचे पालन करणे आवश्यक असेल.

३५. काम सुरु करण्यापूर्वी कामा संबंधी आवश्यकत्या सर्व सूचना अभियंतायांचे कडून घेऊन नंतरच निविदाधारक यांनी कामास सुरुवात करण्याची आहे. तसेच काम सुरु करण्याची तारीख नगरपंचायतीस निविदाधारक यांनी आगावू कळविणेची आहे.

३६. कामाचे अंदाजपत्रक स्पेसिफिकेशन वगैरेच्या बाबतची माहिती उपलब्ध करुनघेण्याची जबाबदारी निविदाधारक यांची आहे.

३७. अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत सर्व कामे विहीत मुदतीत समाधान कारकपुर्ण करुन देण्याची जबाबदारी निविदाधारक यांची आहे. तसेच कामांचा वेळो वेळी प्रगती अहवाल निविदाधारक यांनी नगरपंचायतीकडे कळविणेचाआहे.

३८. निविदाधारक यांनी समाधानकारक काम पुर्ण न केल्यास अगर अर्धवट सोडून दिल्यास या कामासाठी भरलेली बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेचा अधिकार मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांना आहे. त्या बाबतची निविदाधारक यांची कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच सदर काम अन्यमक्तेदाराकडून निविदाधारक यांनी करुन घेतल्यास नगरपंचायतीचे जे नुकसान होईल ते निविदाधारकयांनी बिनतक्रार भरुन देण्याचे आहे. अन्यथा नुकसान भरपाईची रक्कम मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांना निविदाधारक यांच्या इतर देय रकमेतून कायदेशीर तरतुदी प्रमाणे वा अन्य प्रकारे वसूल करण्याचा अधिकार राहील.

३९. निविदाधारकांचे काम समाधानकारक आहे अशी संबंधित अधिका-यांची खात्री झाल्यास निविदाधारक यांना कामाची रनिंग बिले अदाकरणेत येतील. काम पुर्ण झाल्यावरअंतिम बिल निविदाधारक यांच्या मागणी अर्जानुसार अदा करणेत येईल.

४०.कामाचे जागेवर निविदाधारक यांनी स्वतः हजर राहणेचे आहे. कामासाठी वापरण्यात येणारे मटेरियल निविदाधारक यांनी व्यवस्थित साठा करुन ठेवणेचे आहे. त्याच प्रमाणे कामाचे साहित्य नगरपंचायत अभियंता यांनी पसंत केल्या नंतर कामास वापरण्याचे आहे. ना पसंत केलेले साहित्य निविदाधारक यांनी जागे वरुन २४ तासात स्व खर्चाने हलविणेचे आहे. साठा करुन ठेवलेल्या मटेरियलमुळे तसेच कामचालू असताना वाहतूकीस अडथळा येणार नाही याची दक्षता निविदाधारक यांनी घ्यावयाची आहे.

४१. कामासाठी लागणारे सर्व साहित्य निविदाधारक यांनी स्वतः आणणेचे असून सर्व साहित्य जागेवर आणताना त्यावरील सर्व प्रकारचे कर भरणेची जबाबदारी निविदाधारक यांची राहील. अंदाजपत्रक अंदाजे असल्यामुळे कमी जास्त होणारे कामाप्रमाणे प्रत्यक्ष मोजणी होवून बिल निविदाधारक यांना अदा करणेत येईल.

४२.जागेवरील परिस्थिती प्रमाणे मंजूर कामात काही कारणास्तव मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांनी घट केल्यास त्यामुळे कमी होणा-या कामाबाबतची कोणत्याही प्रकारे नुकसान भरपाई निविदाधारक यांस मिळणार नाही.

४३.सदर कामावर निविदाधारक, यांच्या वतीने कोणीही इसम अगर मजूर कामावर नेमल्यानंतर कोणत्याही कारणास्तव त्यांना नुकसान भरपाई देणेची झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी निविदाधारक यांची आहे. मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांजकडे कोणत्याही प्रकारची मागणी करता येणार नाही. कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अपघात होऊन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देणेची झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी निविदाधारक यांची राहील.

४४. सदर कामासाठी लागू असणारा GST, आयकर तसेच निविदाधारकानी त्यांच्या अखत्यारित काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा (EPF) भविष्यनिर्वाह निधी, ESIC व इतर कपाती शासन निर्णयाप्रमाणे करण्याच्या जबाबदारी संबंधित निविदाधारक यांची राहील.

४५. देयक अदा करणेपूर्वी संबंधित निविदाधारकाने GST Invoice, EPF व ESIC भरलेचे चलन सादर करणे बंधनकारक आहे अन्यथा देयक अदा केले जाणार नाही यांची संबंधित ठेकेदाराने नोंद घ्यावी.

४६.शासकीय लेखा परिक्षण (Local fund Audit, A.G. Audit Mumbai Any other Audit Conducted by state government) झाल्यानंतर त्यामध्ये निविदाधारक यांचे कामाबाबत काही वसूली निघाल्यास ती विनाविलंब तसेच विनातक्रार मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांनी सांगितल्याप्रमाणे जमा करणेची आहे.

४७. सदरचे काम करत असताना आवश्यकती सर्व सुरक्षा व काळजी निविदाधारक यांनी स्वखर्चाने घ्यावयाची आहे. सदर काम करत असताना कसलाही अपघात घडल्यास होणा-या जिवीत व वित्तहानीस निविदाधारक जबाबदार राहतील. त्यास नगरपंचायत जबाबदार राहणार नाही. सदरकामाच्या ठिकाणी काम चालू असल्याचा फलक लावणे बंधनकारक आहे.

४८.सदरचे काम कोणत्याही कारणामुळे अपूर्ण राहिल्यास अथवा रद्द झाल्यास निविदाधारक हे मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांचेकडे कसलीही भरपाई मागू शकणार नाहीत.

४९.काम चालू असताना आवश्यक तर रात्रीच्या वेळी कामावर वॉचमन निविदाधारक ठेवतील. तसेच धोक्याची सूचना देणा-या लाल दिव्याची व्यवस्था निविदाधारक यांनी स्वखर्चाने करावयाची आहे.

५०. कामाच्या आवश्यकत्या बाबींचे टेस्ट रिपोर्ट सक्षम प्राधिकरणाचे निविदाधारक यांनी सादर करणे बंधनकारक राहील.

५१. सदर निविदेमध्ये व सदर कामाच्या प्रशासकीय मान्यतेमध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती तसेच नगरपंचायतीकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करणे निविदाधारक यांच्यावर बंधनकारक राहील.

५२. कामांचे सुरु होण्या अगोदरच व काम सुरु असताना टप्प्या टप्प्याने तसेच काम पुर्ण झालया नंतरचे सर्व GEO tag असलेले छायाचित्र तारखेसह या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

५३. बरीचशी कामे निविदाधारक विहित मुदतीतपुर्ण करत नसल्यामुळे गुहागर नगरपंचायतीचे अगोदर कोणेतेही काम संबंधित कंत्राटदार करत असेल तर ते काम गुणवत्ता पुर्ण व विहितवेळेत पुर्ण करणेबाबत चे रू. ५००/- च्या मुद्रांकावर हमीपत्र लिहून देणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

५४.कोणत्याही स्पष्टीकरणा करीता निविदाकारने दुरध्वनी क्रमांक ८४४६६०२४९२ शी संपर्क साधावा.

५५.पत्रव्यवहाराकरीता संपर्क व्यक्ती व पत्ता मुख्याधिकारी नगरपंचायत गुहागर, ता. गुहागर, जि.रत्नागिरी.

५६. कोणत्याही कारणाशिवाय निविदा रद्द करणेचा किंवा स्विकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

नगरपंचायत गुहागर
स्थापना
६ ऑक्टोबर
२०१२
जि.रत्नागिरी

**(स्वप्निल चव्हाण)**
**मुख्याधिकारी,**
**गुहागर नगरपंचायत,गुहागर**

Signature Not Verified
Digitally signed by SWAPNIL PANDURANG CHAVAN
Date: 2026.05.15 06:58:29 IST
Location: Maharashtra-MH